संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर
संपादकीय
नवा काळ
।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# लोकपालांची नियुक्ती हा लोकशाहीचाच विजय

**भारतीय** लोकशाहीला अधिक समृध्द आणि मजबुत करणारी ऐतिहासिक घटना घडून आली. स्वातंत्र्याच्या सत्तर वर्षानंतर आणि खरे तर जवळपास गेली चाळीस वर्षे ज्याची सातत्याने मागणी केली जात होती. त्या लोकपालांची आणि लोकपाल समितीची आता अधिकृतपणे नियुक्ती झालेली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती पी. सी . घोष यांना देशाचे पहिले लोकायुक्त होण्याचा मान मिळालेला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली आठ जणांची लोकपाल समितीही नियुक्त झाली. त्यातले चार सदस्य हे न्यायालयांशी संबंधित आहेत. तर अन्य चार सदस्यांमध्ये अनुसूचित जाती जमातीच्या सदस्यांबरोबरच एक महिला सदस्यही नियुक्त करण्यात आली आहे. आता साधारण शिपायापासून ते थेट पंतप्रधानांपर्यंत देशातील कोणालाही लोकायुक्तांकडे त्यांच्याविरुध्द तक्रार करता येऊ शकेल. यामध्ये संसद सदस्यांचाही समावेश केला गेला आहे. फक्त संरक्षण खाते या चौकशीपासून अलिप्त ठेवले गेले आहे. पंतप्रधानांविरुध्दसुध्दा तक्रार करताना ती देशाच्या सुरक्षिततेसंबंधित मुद्दांशी किंवा परराष्ट्र धोरणाशी संबंधित असता कामा नये. अशी एक अट मात्र घातली गेली आहे. आतापर्यंत सगळे राजकीय लोक मनमौजीपध्दतीने वागत होते. त्यांच्याविरुध्द तक्रार करण्याकरीता योग्य ती व्यवस्था किंवा व्यासपीठच उपलब्ध नव्हते. किंबहुना तक्रार दाखल करून घेतानासुध्दा न्यायालयांना बऱ्याच कायदेशीर अडचणींचा सामना करावा लागत होता. आता देशातला सामान्यातला सामान्य माणूस लोकायुक्तांकडे आपले गाऱ्हाणे मांडू शकेल. लोकायुक्त नेमण्याचा प्रमुख उद्देश असा होता की गोपनीयतेच्या नावाखाली सरकारी यंत्रणेतला भ्रष्टाचार दडवून ठेवला जातो. आणि त्यातल्या भ्रष्टाचाऱ्यांविरुध्द तक्रारी करूनही कोणतीच कारवाई होत नव्हती, आता एक स्वतंत्र निष्पक्ष किंबहुना स्वायत्त संस्था आकाराला आली आहे. चाळीस वर्षांच्या अखंड प्रयत्नानंतर हे यश मिळाले असल्याने एकाअर्थी हा लोकशाही व्यवस्थेचाच विजय ठरतो. कारण अशी मागणी करण्याचा अधिकार लोकशाहीनेच देऊ केला. किंवा आपल्या मागणीची पूर्तता करण्याकरीता आंदोलन करण्याचे स्वातंत्र्यसुध्दा याच लोकशाही व्यवस्थेने दिलेले होते. त्याच माध्यमातून लोकपाल नियुक्तीचा सातत्याने आग्रह धरला गेला त्याचा हा परिणाम आहे.

### श्रेय महाराष्ट्राला आणि अण्णा हजारेंना

पुढच्या काही काळात या लोकपाल यंत्रणेचे काम नेमके कसे चालेल. याबद्दलचा खुलासा होईल. परंतु देशातला सरकारी यंत्रणांमधला भ्रष्टाचार नाहीसा करण्याच्या उद्देशाने एक मोठे पाऊल पडले आहे यात काही शंका नाही. लोकपाल नियुक्तीचे श्रेय कोणाही राजकीय पक्षाला घेता येणार नाही. कारण १९७१ साली सर्वप्रथम लोकपाल विधेयक संसदेमध्ये मांडले गेले. परंतु प्रत्येक राजकीय पक्षाने त्याला विरोध केला. गेल्या चाळीस वर्षात आठ वेळा या विधेयकावर चर्चाही झाली. परंतु कोणीही संसद सदस्य किंवा राजकीय नेता खंबीरपणे लोकपाल नियुक्तीच्या मागणीसाठी पुढे येऊ शकला नाही. याचे श्रेय द्यायचे झाले तर ते सर्वोच्च न्यायालयाला आणि यासाठी सातत्याने आंदोलन करणाऱ्या अण्णा हजारेंना द्यावे लागेल. सर्वप्रथम त्यांनी ही मागणी केली होती आणि पाठपुरावाही चालू ठेवला. २०१३ साली दिल्लीत याच मागणीसाठी झालेले अभूतपूर्व आंदोलन आणि त्यात अण्णा हजारेंनी सलग तेरा दिवस केलेले उपोषण देश अजूनही विसरलेला नाही. स्वतः क्लेश सोसून त्यांनी लोकशाहीच्या संवर्धनासाठी आणि सामान्य माणसाच्या हक्कासाठी हा लढा उभारला. दरम्यान याच मागणीसाठी दिल्लीचे वकील प्रशांत भूषण यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती आणि या याचिकेच्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी अनेक सूचना केंद्र सरकारला केल्या आणि अंतिमतः विशिष्ट मुदत देऊन लोकपाल नियुक्त करण्याचे आदेश दिले. यापूर्वीच्या सरकारने लोकपाल विधेयक पारित केले होते. परंतु प्रत्यक्ष लोकपाल नियुक्तीसाठी काही ना काही कारणे काढून टाळाटाळ केली जात होती. त्या सर्व गोष्टींना आता पूर्णविराम मिळाला आहे. म्हणूनच या लोकपाल नियुक्तीचे विशेष श्रेय महाराष्ट्राला आणि अण्णा हजारेंना जाते असेच म्हणावे लागते. जर हा विषयच उपस्थित केला गेला नसता किंवा अण्णा हजारेंनी त्याचा पाठपुरावा केला नसता तर यातले काही घडून आले नसते.

### सामान्य माणसाच्या हक्काचे संवर्धन

भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाहीवादी देश ठरतो. परंतु या सगळ्या लोकशाही व्यवस्थेत सामान्य माणसाला केवळ मतदानापुरताच अधिकार प्राप्त होतो आणि याच व्यवस्थेचा एक भाग म्हणून निवडणुक व्यवस्थेला महत्त्व दिले जाते. केवळ मतदान आणि निवडणुका म्हणजेच लोकशाही असे त्याचे चित्र जाणीवपूर्वक निर्माण केले गेले. खरे तर सामान्य मतदाराने निवडून दिलेले लोकप्रतिनिधी कसा व्यवहार करतात याच्यावरही त्याचे नियंत्रण असले पाहिजे. किंवा त्याविरुध्द दाद मागण्याची व्यवस्था असली पाहिजे. आतापर्यंत राजकारण्यांनी या गोष्टीला महत्त्व दिले नाही. स्वतःविरुध्द तक्रारी किंवा चौकशा करून घेणे कोणत्याही राजकारण्याला आवडणारे नव्हतेच. म्हणूनच त्याला सर्वपक्षीय विरोध होत राहिला. म्हणजे जी लोकशाहीची मूलभूत गरज होती त्यालाच हरताळ फासण्याचा प्रयत्न राजकारण्यांकडून होत राहिला. उशिरा का होईना परंतु आता एका लोकपाल नावाच्या स्वायत्त संस्थेची निर्मिती झालेली आहे. त्याच्या प्रत्यक्ष कार्यवाहीला सुरुवात झाल्यानंतर त्यातल्या काही त्रुटीदेखील लक्षात येतील. परंतु मुळातच काही नव्हते त्यापेक्षा एक व्यवस्था आकाराला येणे अधिक महत्त्वपूर्ण ठरते. लोकांच्या अधिकारांना आणि हक्कांना नवा आयाम यानिमित्ताने प्राप्त होणार आहे. म्हणूनच तो खऱ्या अर्थाने लोकशाही व्यवस्थेचाच विजय ठरतो. अण्णा हजारे म्हणतात त्याप्रमाणे त्यांना पद्मभूषण किंवा पद्मश्री पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर जेवढा आनंद झाला नाही त्याच्यापेक्षा काहीपट आनंद त्यांना लोकपाल नियुक्तीमुळे झाला. अण्णा हजारे यांची प्रतिक्रिया एकाअर्थी सामान्य माणसाला वाटणारे समाधानच व्यक्त करणारी आहे.